# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## सोमवार, दिनांक ९ नोव्हेंबर, २०२० / कार्तिक १८, १९४२ (शके)

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**९३**. सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, २०२० चे व्दितीय (अर्थसंकल्पीय) सत्र शनिवार, दिनांक १४ मार्च, २०२० रोजी संस्थगित झाले. उपरोक्त दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविल्यानुसार लक्षवेधी सुचनांसंदर्भातील जोडपत्रामधील प्रलंबित **१००** लक्षवेधी सूचनांपैकी **३२** लक्षवेधी सूचनांची निवेदने सोमवार, दिनांक ६ जुलै, २०२० रोजी पत्रक-भाग-२ व्दारे तसेच **६८** प्रलंबित सूचनांच्या निवेदनापैकी **२५** सूचनांची निवेदने सोमवार, दिनांक १० ऑगस्ट, २०२० रोजी वितरीत करण्यात आलेली आहेत व गुरुवार, दिनांक १७ सप्टेंबर, २०२० रोजी पत्रक भाग-२ व्दारे **२१** लक्षवेधी सूचनांची निवेदने वितरीत करण्यात आलेली आहेत. आता **२२** प्रलंबित सूचनांच्या निवेदनापैकी **१०** सूचनांची निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत. प्रलंबित **१२** निवेदनांबाबत संबंधित मंत्रालयीन विभागांकडे पाठपुरावा करण्यात येत असून सदर निवेदने प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या प्रती वितरीत करण्यात येतील.

**विधान भवन,**
**मुंबई,**
दिनांक : ९ नोव्हेंबर, २०२०

**राजेन्द्र भागवत**
सचिव
महाराष्ट्र विधानसभा.

**<u>याची प्रत :</u>**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व संबधित सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)

## महाराष्ट्र विधानसभा सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

### श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"मिरा भाईंदर शहरातील लोकसंख्या १२ ते १३ लाखाच्या असपास पोचली आहे, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१३ येथील परिसरात नायझेरिअन लोकाची संख्या वाढत असून त्याचा त्रास स्थानिक नागरिकाना होणे, तसेच नायझेरिअन नागरिक हे अमली पदार्था चे सेवन करत असल्याकारणाने तेथील लहान मुलांना याचा त्रास होण्याची श्यक्यता,. तसेच त्यांच्याकडे कोणतेही दस्तऐवज नसून ते मिरारोड येथे बेकायदेशीर रित्या राहत असणे, त्यामुळे स्थानिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने या नायझेरियन लोकावर योग्य ती कारवाई करावी, जेणेकरुन परिसरातील व आसपासच्या परिसरातील महिलांची, लहान मुला मुलींची सुरक्षितता टिकून राहील,. तरी वाढत असलेल्या या नायझेरियन लोकवार अंकुश लावणे गरजेचे असल्याने, या संबंधातील योग्य निर्णय घेऊन भविष्यातील मुंबई व ठाणे शहरातील वाहतुक कोंडी टाळण्यासाठी शासनाचा निर्णय व या प्रकाराची करावयाची कार्यवाही, शासनाची प्रतिक्रिया व भुमिका."

******************

### मा. गृहमंत्री यांचे निवेदन

मिरा भाईंदर प्रभाग १३ च्या परिसरात वेळोवेळी कॉम्बींग ऑपरेशन्स राबवून अनधिकृत व बेकायदेशीररित्या वास्तव्य करणा-या नायजेरियन व अन्य परकीय नागरिकांबाबतची माहिती प्राप्त झाल्यावर त्यांनी केलेल्या गुन्ह्याच्या अनुषंगाने त्यांच्यावर कारवाई करण्यात येते. त्यानुसार सन २०१८ मध्ये ३ व २०१९ मध्ये ५ नायजेरियन व २ पश्चिम अफ्रीकन नागरिकांना अटक करण्यात आली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

सन २०१८ मध्ये काशिमीरा पोलिस स्टेशन अंतर्गत गु.र.क्र. ८०१/२०१८ एन.डी.पी.एस. कायदा कलम ८ (क), २२ (ब), २९ सह विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ कलम १४ तसेच भारतीय पारपत्र अधिनियम १९६७ कलम ३, १२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून (१) मायकल फ्रान्स न्युडे वय-३५ वर्षे, (२) ओकोरो ल्युके अुक्चु वय-२५ वर्षे, (३) ओमेन किगंसलर चेक्यूबे वय-२१ वर्षे या ३ नायजेरियन नागरिकांना दि. २३/१२/२०१८ रोजी अटक करण्यात आली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

सन २०१९ मध्ये काशिमीरा पोलिस स्टेशन अंतर्गत गु.र.क्र. ५६/२०१९ एन.डी.पी.एस. कायदा कलम ८ (क), २२ (ब), २९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून (१) सॅरी जेन्टस वेस वय-३५ वर्षे, (२) ओजी मोसेस फिलीप्स वय-३० वर्षे, (३) उम्ही ओगबोना पीटर वय-३५ वर्षे, (४) मिचल ओटी निकोलस वय-३० वर्षे,

[कृ.मा.प.

(५) ओलीवर ब्रेस्लोव वय-३३ वर्षे या ५ नायजेरियन नागरिकांना दि. २५/१/२०१९ रोजी अटक करण्यात आली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

सन २०१९ मध्ये काशिमीरा पोलिस स्टेशन अंतर्गत गु.र.क्र. ८०/२०१९ एन.डी.पी.एस. कायदा कलम ८ (क), २१ (ब), २९ सह विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ कलम १४ तसेच भारतीय पारपत्र अधिनियम १९६७ कलम ३, १२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून (१) अँचिपाँग ईमॅन्युअल वय-३७ वर्षे, (२) ओदोई ख्रिस्तोपर उर्फ टोनी वय-२० वर्षे, या २ पश्चिम अफ्रीकन नागरिकांना दि. २/२/२०१९ रोजी अटक करण्यात आली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

मुंबई व ठाणे शहरातील वाहतुकीचे नियमन व नियंत्रण करण्यासाठी रस्ते रुंदीकरण, उड्डाणपुल उभारणे, सागरी तसेच जलमार्ग आखणे, मेट्रो/मोनोरेलची उभारणी करण्यात येत आहे. तसेच परिवहन विभागामार्फत मुंबई शहर व उपनगरात पूर्ण क्षमतेने टॅक्सी व रिक्षा यांचा वापर होण्यासाठी शेअर-ए-टॅक्सी/रिक्षा या सेवा कार्यन्वित करण्यात आल्या आहेत. शासन अधिसुचना क्र. एमव्हीआर ०८१५/प्र.क्र. ३८७/परि-२ दि. १७.०६.२०१७ अन्वये, मोटर वाहन कायदा १९८८ च्या कलम ७४ उपकलम ३ (अ) मधील तरतुदीनुसार टॅक्सी व रिक्षांच्या परवान्यांच्या संख्येवर असणारी बंदी उठविण्यात आली आहे. याशिवाय शहरांतर्गत सक्षम सार्वजनिक प्रवासी वाहतुकीचे अधिकाधिक पर्याय उपलब्ध करण्याचे दृष्टीकोनातून बेस्ट, ठाणे परिवहन, नवी मुंबई परिवहन, मीरा भाईंदर परिवहन, कल्याण डोंबिवली परिवहन या महानगरपालिका परिवहन सेवेच्या बसेसना संपूर्ण मुंबई महानगर क्षेत्रात प्रवासी वाहतुकीची मुक्त परवानगी देण्यात आली आहे.

वाहतूकीस अडथळा होईल, अशा प्रकारे रस्त्यावर उभ्या केलेल्या, तसेच नो-पार्कीगमधील वाहनांवर वाहतूक विभागाकडून सतत कारवाई केली जाते. वाहतुक नियमन व नियंत्रण तसेच वाहतूक नियमाचे उल्लंघन करणा-या वाहन चालकांवर मुंबई शहरातील सीसीटीव्ही कॅमेरेच्या आधारे कारवाई करण्यात येते. तसेच मुंबईत पार्कीगकरिता विविध ठिकाणी "पे अँड पार्क" ही योजना राबविण्यात येते. सकाळी मुंबईकडे जाताना व सायंकाळी मुंबईतून बाहेर पडताना अवजड वाहनांवर बंदी घालण्यात आली आहे. मुंबई शहर व उपनगरातील वाहतुक सुरळीत करण्यासाठी १४१० ट्राफीक वार्डन्स पोलिसांच्या मदतीला उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

*****************

H-1816-1a

**लक्षवेधी सूचना क्र.६२०४** **गृह विभाग**

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन 2020 चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन**

**सर्वश्री कुणाल पाटील, अमिन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, श्री. मोहनराव हंबर्डे, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.६२०४ पुढीलप्रमाणे आहे.**

**"धुळे जिल्हयात गुन्हेगारीच्या प्रमाणात वाढ झालेली असून चोरी, लूटमार, खून, दरोडे, घरफोडी, हे प्रकार रोजचे झाले असून पोलिस यंत्रणा कुचकामी ठरत असणे, गेल्या महिनाभरात अभियंते, सैनिक, पोलिस, वकील, गायक यांच्या घरात चोरट्यांनी सोन्याचे दागिने व रोकड पैसे चोरुन नेल्याचे २२ जानेवारी, २०२० रोजी निदर्शनास येणे, सदर चोरी व लुटमारीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलीस यंत्रणा कुचकामी ठरत असल्याचे दिसून येणे, जिल्हयात महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून भरदिवसा विद्यार्थ्यांनींचा छळ तसेच वृध्द लोकांना लुटण्याचे प्रकार घडत असणे, यामुळे जनसामान्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला असून त्यांच्या मनात पसरलेले भितीचे वातावरण, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर झालेला आहे. सदरहू प्रकरणी चोरी- लुटमार, दरोडा घरफोडी, खून यावर आळा बसण्यासाठी शासनाने सक्षम सुरक्षा व सुव्यवस्था कायदा त्वरीत अंमलात आणण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रीया."**

**मा. गृहमंत्री महोदयांचे निवेदन**

धुळे जिल्ह्यातील दाखल गुन्ह्यांबाबत माहिती दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे-

**शरिराविरुध्द / मालाविरुध्द दाखल गुन्हे**

| अ.क्र | शीर्ष | जुलै २०२० अखेर | | जुलै २०१९ अखेर | |
|---|---|---|---|---|---|
| | | दाखल | उघड | दाखल | उघड |
| ०१ | खून | २१ | २१ | १९ | १७ |
| ०२ | दरोडा | १३ | १२ | २३ | २३ |
| ०३ | जबरी चोरी | ३३ | २० | ७५ | ४९ |
| ०४ | चैन स्नेचिंग | ०५ | | १६ | ०६ |
| ०५ | घरफोडी | ७९ | २१ | ९८ | २२ |
| ०६ | चोरी | २५२ | ७५ | ४१४ | १२४ |

सन २०१९ (जुलै अखेर) च्या तुलनेत सन २०२० (जुलै अखेर) मधील दाखल मालाविरुध्द/ शरीराविरुद्धच्या गुन्हयांची घट-वाढ खालील प्रमाणे आहे.

दरोडा या सदराखाली १० गुन्ह्यांनी घट झाली आहे.

जबरी चोरी या सदराखाली ४२ गुन्ह्यांची घट झाली आहे.

चैन स्नेचिंग या सदराखाली ११ गुन्हयांची घट झाली आहे.

घरफोडी या सदराखाली १९ गुन्ह्यांची घट झाली आहे.

चोरी या सदराखाली १६२ गुन्ह्यांनी घट झाली आहे.

माहे जुलै २०२० अखेर एकुण ७९ घरफोडया दाखल असून पोलीस आणि वकील यांचे घरी चोरट्यांनी केलेल्या चोरी, घरफोडीचे ०४ गुन्हे दाखल असून त्यापैकी ०२ गुन्हे उघडकीस आले आहेत.

**महिलांवरील अत्याचाराबाबत दाखल गुन्हे**

| अ क्र | शीर्ष | जुलै २०२० अखेर | | जुलै २०१९ अखेर | |
|---|---|---|---|---|---|
| | | दाखल | उघड | दाखल | उघड |
| ०१ | बलात्कार (एकुण) | ३० | ३० | ३० | ३० |
| | पोक्सोसह | १९ | १९ | २० | २० |
| ०२ | विनयभंग (एकुण) | ७३ | ७३ | ९२ | ८७ |
| | पोक्सोसह | १७ | १७ | २२ | १९ |

रोटा H/1793-1 (750-10-2020) [कृ.मा.प.

महिला अत्याचाराचे अनुषंगाने विनयभंग या सदराखाली १९ गुन्ह्यांनी घट आहे. तसेच बलात्कार या सदराखाली गुन्ह्यांमध्ये कोणतीही वाढ झालेली नाही.

उपरोक्त तुलनात्मक तक्ते पाहता दरोडा, जबरी चोरी, चैन स्नेचिंग, घरफोडी, चोरी या गुन्ह्यामध्ये घट झाली आहे.

**गुन्हे उघडकिस आणण्यासाठी किंवा आळा घालण्यासाठी करण्यात येणारे प्रयत्न खालीलप्रमाणे-**

प्रभावी पेट्रोलिंग, विविध गुन्ह्यात आवश्यकतेप्रमाणे पोलीस फॉरेन्सीक व्हॅन, फिंगरप्रिंट एक्सपर्ट, व्हीडीओ ग्राफर, सायबर सेंल यांचा प्रभावीपणे वापर करण्यात येतो.

पोलीस व नागरीक यांचा समन्वय साधण्यासाठी वेळोवेळी कॉर्नर मिटींग घेण्यात येते, तसेच नागरीक व पोलीस यांचेत सलोख्याचें व मैत्रीपुर्ण संबंध निर्माण होऊन त्यांचेत सुरक्षीततेची भावना निर्माण व्हावी याकरीता वेळोवेळी स्थानिक रेडीओ, वृत्तपत्रे, स्थानिक टि.व्ही. चैनल याचे मार्फतीने जाहिरात देऊन जनजागृती करण्यात येते .

धुळे जिल्ह्याला लागुन मध्य प्रदेश व गुजरात राज्य असुन त्यांचे सोबत माहितीचे आदानप्रदान करण्यात येत असते. वेळोवेळी सिमावर्ती राज्यांची बॉर्डर कॉन्फरन्स घेण्यात येते. त्यात गुन्हेगार, समन्स वारंट, फरार आरोपी यांची माहिती आदानप्रदान केली जाते.

धुळे जिल्हा घटकात रात्रीचे वेळी गुन्ह्यांना आळा घालण्याच्यानुषंगाने रात्री बिट मार्शल तसेच, रात्रीचे वेळी मुख्य बाजारपेठ, बँक परिसर तसेच शासकीय आस्थापना या परिसरात प्रभाव पेट्रोलींग करण्यात येते.

जिल्हा रात्रग्रस्त मोबाईल पेट्रोलींग तसेच विभागीय रात्रगस्त मोबाईल पेट्रोलींग अशा- पेट्रोलिंग वरीष्ठ स्तरावर नेमणूक करण्यात आल्या असून त्यातील अधिकारी व कर्मचारी जिल्हयाचे अभिलेखावर असणारे गुन्हेगार यांना सतत चेक करीत असतात.रात्रगस्ती दरम्यान आलेले प्रत्येक कॉलला वेळीच प्रतिसाद देऊन त्याप्रमाणे कारवाई करण्यात येते.

धुळे जिल्हा घटकात प्रभावीपणे दरोडा प्रतिबंधक योजना राबविण्यात येत असुन, केलेल्या कारवाईचा दरोरोज आढावा घेण्यात येतो. त्यादरम्यान रात्रगस्तीचे सर्व मोबाईल बिट मार्शल, रात्रग्रस्त कर्मचारी यांना वेळोवेळी चेक करण्यात येते. तसेच सदर दरोडा प्रतिबंधक योजना प्रत्येक महिन्याला बदलण्यात येते. त्यामुळे या योजनेचा जिल्हयात प्रभावीपणे अंमलबजावणी सुरु आहे.

विशेषतः महिला व लहान मुलांचे सुरक्षेकरीता दामीनी पथकामार्फत सतत पेट्रोलींग करुन टवाळखोरांवर वेळीच कारवाई करण्यात येते –

महिला व लहानमुले तसेच जेष्ठ नागरीक यांचे सुरक्षेला विशेष प्राधान्य देऊन प्रभावीपणे कायदा व सुव्यवस्था अबाधित राहाण्यासाठी नियोजनबध्द कारवाई करण्यात येत आहे. त्यांचे सुरक्षीतते करीत आलेल्या कॉलला तत्काळ प्रतिसाद दिला जातो व तात्काळ कारवाई करण्यात येते. तसेच लहान मुले, महिला व जेष्ठ नागरीक याचे सुरक्षेकरीता प्रतिसाद ॲप तयार करण्यात आले असुन, सदर ॲपवर आलेले कॉल्स तात्काळ तपासण्यात येऊन त्याप्रमाणे तात्काळ कारवाई करण्यात येते.

धुळे जिल्हा पोलीसांतर्फे वेळोवेळी ऑलआऊट स्कीम राबवुन अचानक नाकाबंदी करुन तपासणी करण्यात येत.

जनतेच्या मनात सुरक्षीततेची भावना निर्माण व्हावी या करीत दंगा काबु योजनेचे वेळोवेळी प्रात्यक्षिक घेण्यात येतात. तसेच आर. सी. पी. व क्यु. आर. टी. पथकाची सतत पेट्रोलींग सुरु ठेवली जात आहे.

पोलीस ठाण्यांकडुन प्राप्त हद्दपार प्रस्तावाप्रमाणे तात्काळ प्रभावी कारवाई करण्यात येवुन आरोपीविरुद्ध मुंबई पोलीस अधिनिय कलम ५५, ५६, ५७ प्रमाणे कारवाई करुन त्यांना हद्दपार करणेबाबत कायदेशीर प्रक्रिया करण्यात येत आहे.

एकंदरीत धुळे जिल्हयात सामान्य नागरीकांचे मनात कोणतेही भीतीचे वातावरण निर्माण झालेले नसुन कायदा व सुव्यवस्थेला प्रथम प्राधान्य देण्याबाबत सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकार याना सक्त सुचना देण्यात आलेल्या आहेत.

*************************************************************

H/1793-1a

लक्षवेधी सूचना (30)

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्प) अधिवेशन**

**डॉ. संजय रायमुलकर, सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"नाशिक येथील राहूल सुभाष जाजू रा. कॅनडा कॉर्नर, शरणपूर रोड या उद्योजकाने सन २०१७ मध्ये मंगरूळ (ता. चांदवड, जि. नाशिक) येथील जमिनीबाबत खोटे मृत्युपत्र तयार करणे, सदर मृत्युपत्राच्या आधारे सातपूर येथील ३९ वर्षीय एक महिलेचे वारसदार म्हणून कागदपत्रे तयार करणे, उपरोक्त जमीनीवर नांव लावण्याच्या आमिषाने उक्त महिलेवर चार वेळा बलात्कार करणे, पीडित महिलेने मनमाड पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर राहूल जाजू या संशयिताच्या विरूध्द दिनांक १२ नोव्हेंबर, २०१९ रोजी गुन्हा दाखल करण्यात येणे, तीन महिन्याचा कालावधी उलटूनही पोलीसांनी संबधित उद्योजकांच्याविरूध्द अद्याप कोणतीही कारवाई न करणे, त्यामुळे पिडीत महिला व तिच्या कुटुंबियांमध्ये भितीचे व असुरक्षिततेचे पसरलेले वातावरण, संबंधित संशयिताविरूध्द तातडीने कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, प्रतिक्रिया व भूमिका"

.......................................................................................

**मा.मंत्री (गृह) महोदय यांचे निवेदन**

फिर्यादी यांच्या मावशी यांनी फिर्यादीचे नावे तयार केलेले जमिनीच्या संबंधातील मृत्युपत्र स्वताचे ताब्यात ठेवून जमिनीचे काम करून देतो असे आमिष दाखवून, आरोपी याने फिर्यादीची फसवणूक करून, तिचे लैंगिक शोषण केल्याबाबत फिर्यादी यांनी केलेल्या तक्रारीवरून चांदवड पोलीस ठाणे, जि. नाशिक येथे दि. १२.११.२०१८ रोजी भा.द.वि. कलम ३७६ अन्वये गु.र.क्र. १८४/२०१८ दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासात फिर्यादी यांनी आरोपीस कॅनडा कॉर्नर येथील ऑफिसमध्ये सन २०१७ मध्ये भेटल्याचे सांगीतले. परंतू आरोपी याने सदर ऑफिससाठी भाड्याने घेतलेला गाळा सन २०१४ मध्येच सोडलेला आहे. तसेच फिर्यादी यांनी तक्रार देतेवेळी राहुल जाजू हाच आरोपी असल्याचे ठामपणे सांगीतले. तथापि, फिर्यादी यांनी आरोपीस एका कार्यक्रमात पाहून तो व्यक्ती राहुल जाजू नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. फिर्यादीस सदर गुन्ह्याच्या तपासासाठी वेळोवेळी पोलीस ठाणे येथे बोलविले असता, फिर्यादी तपासात सहकार्य केलेले नाही. फिर्यादी यांच्या तक्रारीनुसार केलेल्या तपासात फिर्यादी यांनी आरोपीविरूध्द दिलेली तक्रार खोटी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर प्रकरणातील आरोपीस मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. १९.०१.२०१९ रोजी अटकपूर्व जामिन मंजूर केला असून, सदर प्रकरणी केलेल्या तपासाबाबत मा. न्यायालयास "ब" वर्ग समरी मंजूर होण्यासाठी अहवाल सादर केला आहे.

****************************************************************

हॉइट/एच १८१० [७५०-१०-२०२०].

(४३)

## सन २०२० चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन
## विधान सभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक-४३

**श्री.दादाराव केचे, वि.स.स. यांनी विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना खालील प्रमाणे आहे:-**

**"वर्धा जिल्ह्यातील आर्वी विधानसभा मतदार संघातील मौजा कारंजा , ता. कारंजा, इंदिरानगर, खर्डीपुरा, मौजा आष्टी, ता. आष्टी, नगरपचायत अंतर्गत गौरखडा व झोपडपट्टी भागातील वार्ड क्र. ६,७,८ तसेच मौजा बोटोणा, मौजा माळेगाव (काळी) मौजा ब्रम्हणवाडा, ता. कारंजा, मौजा खडकी (शिरपूर) मौजा कासरखेडा ग्रामपंचायत अंतर्गत सावधहेटी, ता. आर्वी, मौजा तारासावंगा, ता. आष्टी मौजा नांदपुर, मौजा सावळापुर ग्रामपंचायत अंतर्गत बाभुळगांव, मौज सारवाडी, ता. कांरजा, मौजा किन्हीमोई, ता आष्टी सदरहू गावातील सदरहू गावांतील रहिवाशी ३० ते ४० वर्षापासून महसूल व वन विभागाच्या जागेवर आपले घर बांधून राहत असणे, अजूनपर्यन्त त्यांना घराचे पट्टे न मिळणे, याच कारणावरुन तेथील रहिवाशी लोकांना शासनाच्या योजनांचा लाभ न मिळणे, शासनाच्या मुलभूत गरजा पूर्ण न होणे व त्यापासून त्यांचे जीवनामध्ये अमुलाग्र बदल न घडणे, यासर्व गोष्टींचा विचार करुन सदरहू गांवातील रहिवाशींना राहत असलेल्या घरांना पक्के पट्टे देणे व त्यांना पंतप्रधान आवास योजनेतंर्गत घरकुलाचा लाभ देऊन त्यांचे जिवनमान उचविण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, सदरहू गांवातील नागरीकांना तातडीने न्याय मिळवून देण्याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही उपाययोजना व प्रतिक्रिया."**

## मा.मंत्री.(ग्राम विकास) यांचे निवेदन

वर्धा जिल्ह्यातील कारंजा तालूक्यांतर्गत मौजे कारंजा , इंदिरानगर येथील सर्वे क्रमांक २५० मध्ये ०.८४ हे.आर.व खर्डीपुरा येथील सर्व्हे.क्र. १२२९ येथील अतिक्रमणे हे झुडपी जंगल जागेवर असल्याने घरांचे पट्टे वाटप करणे शक्य होत नाहीत. तथापि, इंदिरानगर येथील सर्व्हे क्र. २५० मध्ये सन १९७५ मध्ये एकूण १२६ बेघर लाभार्थ्यांना घरांचे पट्टे वाटप करण्यात आलेले आहे . मौजे सारवाडी अंतर्गत नमूना ८ प्रमाणे ७३ अतिक्रमणधारक असून त्यापैकी ६९ गावठाणातील १ महसूल व ३ वन जमिनीवरील आहेत . मौजा बोटोणा अंतर्गत सर्व १५ अतिक्रमणे वन जमिनीवरील आहे . मौजे माळेगांव (काळी) अंतर्गत ७ अतिक्रमणे असून ४ महसूल व २ वन व १ गावठाण जागेवरील आहे. मौजा ब्रम्हणवाडा अंतर्गत ६१ व खैरवाडा येथील १ अतिक्रमणे झूडपी जंगल व कुरण जागेवरील आहे . या प्रमाणे कारंजा तालुक्यातील एकूण १५७ अतिक्रमणांची नोंद संगणकीय प्रणालीवर घेण्यात आलेली असून या प्रकरणी नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. आर्वी तालुक्यांतर्गत मौजे खडकी (शिरपूर), कासारखेडा, सावधहेटी, नांदपूर, बाभूळगांव ग्रामपंचायत अंतर्गत अतिक्रमणे नियमानुकूल करणे अथवा घरांचे पट्टे वाटप करण्याबाबतचे प्रस्ताव प्राप्त नाही. सावळापूर येथील अतिक्रमण हे खाजगी जागेवरील अतिक्रमण आहे. आष्टी तालुक्यांतर्गत नगरपंचायत गौरखेडा व झोपडपट्टी भागातील वार्ड क्र .६ , ७ व ८ हे अतिक्रमणे खाजगी जमिनीवरील आहे. मौजा किन्ही मोई अंतर्गत घरांचे पट्टे वाटप करण्याबाबतचे प्रस्ताव प्राप्त नाहीत. मौजा तारासावंगा अंतर्गत १४ लाभार्थींपैकी १२ लाभार्थ्यांना घरांसाठी पट्टे वाटप करण्यात आले आहे. २ लाभार्थी अपात्र आहे. यापैकी ९ लाभार्थ्यांना घरकुल योजनेंतर्गत घरकुल मंजूर झालेले असून ३ लाभार्थी प्रतिक्षायादीमध्ये असून प्राधान्यक्रमानुसार या लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करावयाची कार्यवाही करण्यात येत आहे.

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**ॲड आशिष शेलार, ॲड पराग अळवणी, सर्वश्री. प्रशांत ठाकूर, संजय केळकर, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री. किसन कथोरे, अमित साटम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री. श्रीनिवास वनगा, देवेंद्र फडणवीस, अतुल भातखळकर, राणाजगजीतसिंह पाटील, राम कदम, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री. संतोष दानवे, अभिमन्यु पवार, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री. अबू आजमी, रईस शेख, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री. वैभव नाईक, महेंद्र थोरवे, मंगेश कुडाळकर, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री. विश्वनाथ भोईर, सुनिल प्रभु, राधाकृष्ण विखे-पाटील, अजय चौधरी, चेतन तुपे, सुनिल टिंगरे, सुनिल शेळके, अशोक पवार, मोहन मते, प्रमोद पाटील, चंद्रकांत जाधव, किशोर जोरगेवार, राजु आवळे, प्रताप सरनाईक, अमित पटेल, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.**

"सर्वसामान्य ग्राहकांच्या वीज पुरवणाऱ्या महावितरणाच्या अतिरिक्त वीज खरेदी व विक्रीत तब्बल ३,२७० कोटी रुपयांची तफावत असल्याचे माहे फेब्रुवारी २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, थकीत वीज देयकांची रक्कम भरमसाट असल्याने एकूण महसूलाच्या ७५ टक्के रक्कम थकबाकीचीच असल्याचे भीषण वास्तव नवी मुंबईत दिनांक ८ फेब्रुवारी, २०२० रोजी झालेल्या दर निश्चिती संबंधीच्या जन सुनावणीत समोर येणे, कंपनीला पुढील पाच वर्षांत सरासरी ७,२७१ कोटी रुपयांच्या महसूलाची गरज असल्याने, वीज दरवाढीचा सर्वसामान्यांवर बोजा पडणार नसल्याचे मा. ऊर्जा मंत्री सांगत असतानाही महावितरणाने कमी वीज वापर करणाऱ्या ग्राहकांवरच पाच ते आठ टक्के दरवाढीचा बोजा टाकण्याचा प्रस्ताव दिलेला असणे, नवी मुंबईत मुंबई, ठाणे, पालघर, रायगड या भागांसाठी महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने घेतलेल्या सुनावणीत कंपनीकडून वीज बिलांच्या वसूलीतच घोळ केला जात असल्यानेच महसूलाची वाढती गरज असल्याचे दिसून येणे, महावितरणने २०१८-१९ मध्ये ५,६७० तर २०१९-२० मध्ये ३,५६७ कोटी रुपयांची अतिरिक्त वीज खरेदी केलेली असून या अतिरिक्त वीज खरेदीच्या तुलनेत २०१८-१९ मध्ये ३,७७८ कोटी तर २०१९-२० मध्ये २,९९१ कोटी रुपयांच्याच वीजेची विक्री होत असणे, वीज खरेदी व विक्री यातील तूट या दोन्ही वर्षी अनुक्रमे १,८९२ व १,३७८ कोटी रुपये असणे, यातूनच महावितरणाची भीषण स्थिती उघडकीस येणे, महावितरण वीज खरेदी कराराद्वारे निर्मिती प्रकल्पांकडून वीज खरेदी करते. करारानुसार वीज खरेदी केली नाही तरी, स्थिर शुल्काच्या रुपात काही ठराविक रक्कम त्या वीज प्रकल्पाला द्यावीच लागत असणे, अशाच एका प्रकल्पाकडून महावितरणाला आता ५.१० रुपये प्रति युनिट दराने वीज मिळत असताना पण त्याचवेळी अन्य प्रकल्प ३.३० रुपये दराने वीज देण्यास तयार असतानाही कराराच्या नावाखाली महावितरण नाहक महागडी वीज खरेदी करीत असणे, वास्तवात एकदा स्थिर आकार दिल्यानंतर वीज खरेदीचे बंधन नसने, त्यामुळे त्या संबंधित प्रकल्पाला ते शुल्क देऊन ही महागडी वीज खरेदी बंद करण्यासाठी व सर्वसामान्य ग्राहकांवर लादण्यात येणारी दरवाढ थांबवण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### मा. मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दि. ३०.०३.२०२० रोजी सन २०२०-२१ ते सन २०२४-२५ या वर्षांकरिता महावितरण कंपनीकरिता बहुवार्षिक वीज दर आदेश जारी केले. सदर आदेशामध्ये सन २०१७-१८ व

सन २०१८-१९ या वर्षांकरिता एकूण महसूलाची गरज तसेच सन २०१९-२० या वर्षाकरिता एकूण महसूलाच्या गरजेचे तात्पुरते समायोजन यांच्या समावेश आहे.

मा. वीज नियामक आयोगाने याचिका क्र.१९५/२०१७ संदर्भात दि. १२.०९.२०१८ च्या आदेशान्वये महावितरण कंपनीसाठी सन २०१८-१९ साठी रु. ५०,५८९ कोटी वीज खरेदी करण्यासाठी मंजुर केले होते. परंतु प्रत्यक्षात हा खर्च रु. ५६,२६० कोटी इतका झालेला आहे. जास्तीच्या रु. ५६७१ कोटी हा वाढीव खर्च प्रामुख्याने वीज नियामक आयोगाने मंजूर केलेल्या १२७१९९ दश लक्ष युनिट पेक्षा प्रत्येक्षात १३६२५१ दश लक्ष युनिट म्हणजेच ९०५२ दश लक्ष युनिट जास्तीची वीज सरासरी रु. ४.०५ दराने केल्यामुळे तसेच कोळसा टंचाईमुळे, वीज खरेदी अंतर्गत असलेल्या कायदा बदलाच्या प्रावधानानुसार वीज नियामक आयोगाने मंजूर केलेला परिणाम, तसेच मा. केंद्रिय विद्युत नियामक आयोगाने जुन २०१८ व जुलै २०१८ मध्ये नविन वाढ अनुक्रमणिका (Escalation Index) मंजुर केल्यामुळे झालेला आहे माहे सप्टेंबर २०१८ व ऑक्टोंबर २०१८ मध्ये विजेची उच्चतम मागणी अनुक्रमे २०,३३० मे.वॅ. व २१,६०७ मे.वॅ. इतकी नोंदवली गेली. जी मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे २१ टक्क्याने जास्त होती. तसेच या कालावधीत देशव्यापी असलेल्या कोळशाच्या उपलब्धतेतील तुटवडयामुळे दिर्घकालीन करारीत केलेल्या एकूण २१,९९२ मे.वॅ. औष्णिक वीज निर्मिती केंद्रामधून विजेची उपलब्धता केवळ १२,५०० ते १३,९०० मे.वॅ. इतकी होत होती. यामुळे जरी वीज निर्मिती कंपन्यांना स्थिर आकार दयावा लागणार नसला तरी ग्राहकांना सणासुदीच्या काळात अखंडीत व सुरळीत वीजपुरवठा करणे ही महावितरण कंपनीची बांधिलकी असल्यामुळे, महावितरण कंपनीस लघुकालीन तसेच पॉवर एक्सचेंजमधून सुमारे रु. १६७२ कोटीची जास्तीची वीज उपलब्ध असलेल्या वाढीव दराने खरेदी करावी लागली. तसेच वीज विक्रीपोटी मध्यावधी वीज दर आदेशामध्ये रु. ७४,१७९.४५ कोटी मंजुर होते परंतु आयोगाने प्रत्यक्षात रु. ७८,९६५.३० कोटी मंजुर केले आहेत. हे पाहता खरेदीच्या तुलनेत विक्री झाल्याचे दिसून येते व त्यास मा. आयोगाची मान्यता प्राप्त आहे असे दिसून येते.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दि. ३०.०३.२०२० आदेशानुसार सन २०१९-२० मध्ये वीज खरेदी खर्चाकरिता मध्यावधी वीज दर आदेशामध्ये रू. ५६,३०५.४५ कोटी इतके मंजुर केले होते परंतु तात्पुरते समायोजनामध्ये हा खर्च रू. ५५,९६७.६२ कोटी इतका मंजुर केला आहे. तसेच मध्यावधी वीज दर आदेशामध्ये वीज विक्रीद्वारे रू. ६८,८१३.५५ कोटी मंजुर केले होते परंतु प्रत्यक्षात रु. ७२,५९१.७२ कोटी मंजुर केले आहेत असेही दिसून येते.

महावितरण कंपनीने बहुवार्षिक वीज दर याचिकेमध्ये दि. ३१.०३.२०२० पर्यंत एकूण रु. ५६,३६२ कोटी इतकी थकबाकी असल्याने नमुद केले होते त्यापैकी रु. ३८,१३८ इतकी थकबाकी कृषी ग्राहकांची आहे. महावितरणची लेखापद्धती ही ॲक्रुअल पद्धतीवर आधारित आहे. म्हणजेच महावितरणने बिलींग केलेली संपूर्ण रक्कम (प्रत्यक्ष वसूली झाली नसली तरीही) महसुल म्हणून महावितरणच्या लेखांमध्ये विचारात घेण्यात येते. लेखातत्वानुसार बिलिंग केलेली संपूर्ण रक्कम महसूलामध्ये विचारात घेण्यात आली असल्याने थकबाकीचा महसूली तूटीवर किंवा वीज दर वाढीवर थेट परिणाम होत नाही असे महावितरणद्वारा निदर्शनास आणले आहे.

सन २०१९-२० करिता महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने रु. ७९,०१९ कोटी इतक्या महसूलाच्या गरजेच्या रक्कमेस मान्यता दिली आहे. महावितरणद्वारा केलेल्या याचिकेच्या अनुषंगाने मा. आयोगाद्वारे पारदर्शक पध्दतीने ग्राहकांच्या हरकती व सूचना विचारात घेऊन तसेच २०२०-२१ ते २०२४-२५ या वर्षाकरिता सरासरी रु. ८४,२२३ कोटी इतक्या वार्षिक महसूलाच्या गरजेस मान्यता दिली आहे.

कृषी वर्गवारी वगळता इतर वर्गवारीकडून होणारी वसूली १०० टक्केच्या जवळपास आहे. तसेच महावितरणची एकुण वसुली क्षमता वर्ष २०१७-१८ साठी ९५.९३ टक्के, वर्ष २०१८-१९ मध्ये ९६.१७ टक्के आणि वर्ष २०१९-२० अखेर त्याच्या जवळपास झालेली आहे.

महावितरण कंपनी ज्या प्रकल्पाशी दिर्घकालीन वीज खरेदी करार केलेला आहे अशा प्रकल्पामधुन वीज ही वीज नियामक आयोगाने मंजूर केलेल्या दरानुसारच खरेदी करते. व आयोगाने निश्चित केलेल्या मेरीट ऑर्डर डिस्पॅच तत्वानुसार वीज निर्मिती प्रकल्पाकडून विजेच्या मागणीनुसार उपलब्ध करुन घेते व यात कमी दर असणाऱ्या प्रकल्पाकडून प्राथम्यक्रमानुसार खरेदी करण्यावर भर दिला जातो. तसेच सर्वप्रथम सर्वात जास्त महागडी वीज देणा-या कंपनीला तांत्रिक दृष्टया योग्य असेल ऐवढया पातळी पर्यत विद्युत निर्मिती कमी करण्यासाठी (बॅक डाऊन) सूचना देण्यात येते.

महावितरण कंपनी विजेच्या मागणी नुसार MoD तत्वाचा वापर करुनच वीज खरेदी करीत असल्याने व महागडया दराच्या वीज निर्मिती केंद्राना झिरो शेडयुल/ बॅक डाऊन सुचना देऊन त्यांची वीज खरेदी करत नसल्याने अन्य प्रकल्प ३.३० रु. दराने वीज देण्यास तयार असतांनाही कराराच्या नावाखाली दुसऱ्या प्रकल्पाकडून ५.१० दराची नाहक महागडी वीज खरेदी करते, असे म्हणणे संयुक्तीक होणार नाही. उलटपक्षी, महावितरण पॉवर ट्रेडिंग, पॉवर बँकींग या सारख्या सुविधांचा वापर करुन वीज खरेदी खर्च कमी करण्याचा प्रयत्न करीत आहे.

********************************

लक्षवेधी सूचना क्रमांक : ८१

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२० चे व्दितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

सर्वश्री.भारत भालके, श्री.अबू आजमी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यातील ग्रामीण तसेच शहरी भागातील सर्व शाळांमध्ये बोअरवेल, विहिरी, सार्वजनिक टाक्या व टँकरव्दारा पाणीपुरवठा करण्यात येत असणे, त्यामध्ये शाळांतील विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी व अन्य कारणासाठी पाणीपुरवठा करण्यात येत असणे, पिण्याचे पाणी दूषित असल्याच्या तक्रारी अनेक प्राथमिक जिल्हापरिषद शाळा प्रशासनाकडून शासनाकडे करण्यात येणे, त्यानुसार मुंबई शहर मुंबई उपनगर वगळता राज्यातील ३६ जिल्हयांपैकी ३४ जिल्हयांमधील पिण्याचे नमुने माहे मार्च, २०१९ मध्ये महाराष्ट्र सार्व.आरोग्य प्रयोग शाळांमध्ये तपासण्यात येऊन त्याबाबतचा अहवाल प्रसिध्द करण्यात येणे, या अहवालानुसार वाशिम जिल्हयात २७ टक्के, हिंगोलीमध्ये २४ टक्के, चंद्रपूरमध्ये २१, औरंगाबाद, नांदेड आणि रायगड मध्ये २० टक्के, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, जालना, गोंदिया, पालघर आणि सिंधुदूर्ग १५ टक्के, नागपूर, भंडारा, ठाणे, सोलापूर, सातारा, कोल्हापूर, सांगली, नंदूरबार, वर्धा, गडचिरोली, धुळे आणि जळगांव या जिल्हयांमध्ये ५ टक्के पाणी दूषित असल्याचे नमूद करण्यात येणे, सदर दूषित पाणी शाळेतील विद्यार्थ्यांनी प्यायल्यामुळे या विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होऊन त्यामुळे मुत्रपिंड दगड, मुत्राशय दगड (Urin Stone) मुतखडा, रक्तातील ऑक्सिजन पातळी कमी होणे, या पाण्यात जास्त लोह असल्यामुळे सायडॉसिस आणि मुलाच्या अवयवांचे नुकसान होणे, गॅस आतडीमध्ये तयार होणे, रक्तातील हिमोग्लोबीनला मेथीमोग्लोबीन रूपांतरीत करणे, तसेच शालेय मुलींमध्ये १५ प्रकारचे विविध कर्करोग व जन्मातील दोष निर्माण होणे, उच्च रक्तदाब व पोटाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढणे, तसेच दातांचे विविध आजार, हाडे जाड होऊन थॉयरोडग्रंथीला धोका निर्माण होणे, हाडांतील कॅल्शियम कमी होणे, तसेच शिसे या धातूमुळे मेंदू, यकृत, मूत्रपिंड आणि हाडांमध्ये दोष निर्माण होणे, तसेच दूषित पाण्यामुळे व त्यातील विषारी घटकांमुळे शालेय विद्यार्थ्यांना विविध त्वचाविकार व त्वचेचा कर्क होण्याची दाट शक्यता असणे, इत्यादी जीवघेण्या विविध आजारांना शाळेतील लहान विद्यार्थी व विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागत असल्याने व या दूषित पाणी पिल्यामुळे कालांतराने विविध आजाराचे लक्षणे लवकर आढळून येत नसल्यामुळे शालेय विद्यार्थ्यांना प्रौढ वयामध्ये याचे परिणाम दिसून येणे, यासारखे आजार आढळून येणार असल्याचे दि.२४ फेब्रु.२०२० रोजी वात्यासुमारास आढळून येणे, परिणामी विद्यार्थी यांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होणे, वर्ग व त्यांच्या पालकांमध्ये निर्माण झालेले चिंतेचे वातावरण व असुरक्षिततेची भावना, याप्रकरणी शालेय विद्यार्थ्यांना पिण्याचे शुध्द पाणी मिळण्याच्यादृष्टीने शासनाने तातडीने राज्यातील सर्व शाळांमध्ये शुध्द पाणी विद्यार्थ्यांना मिळणेबाबत RO मशिन (जलशुध्दीकरण उपकरणे) तातडीने बसविण्याची विद्यार्थी व पालकांची मागणी असणे, परंतु त्या मागणीचा अद्यापही शासनाने कोणतीही उपाययोजना केल्या नसल्याने शासनाप्रति सामान्य जनतेची संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रया"

---

मंत्री, शालेय शिक्षण यांचे निवेदन

राज्यातील ग्रामीण तसेच, शहरी भागातील शाळांमध्ये नळपाणी पुरवठा योजना, बोअरवेल, विहिरी, सार्वजनिक टाक्या व काही ठिकाणी टँकरद्वारे पिण्यासाठी पाणीपुरवठा करण्यात येतो. त्यापैकी काही

पुढे मा.प

जिल्हयांमध्ये क्षारयुक्त व दुषित पाण्याचा पुरवठा होत असल्याचे निदर्शनास आले आहे. शासनाने राज्यामध्ये पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अधिपत्याखालील भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणेअंतर्गत १४८ उपविभागीय स्तरावरील, २८ जिल्हा स्तरावरील व ६ विभागीय स्तरावरील प्रयोगशाळा कार्यान्वित केल्या असून त्यांना केंद्र शासनाच्या पाणी गुणवत्ता परिक्षणाच्या धोरणानुसार संदर्भ प्रयोगशाळा म्हणून मान्यता देण्यात आली आहे. दुषित पाण्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होऊन विद्यार्थी आजारी पडल्याबाबत तक्रारी शासनास प्राप्त झाल्या आहेत.

राज्यातील ग्रामीण भागांमध्ये शुद्ध पेयजलाचा पुरवठा करण्यासाठी तसेच पाण्याची गुणवत्ता राखून त्याचे सर्व्हेक्षण व संनियंत्रण करण्याबाबत शासनाकडून सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना वेळोवेळी सूचना देण्यात येतात. यासंदर्भात ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद स्तरावर पाणी गुणवत्ता संनियंत्रणासाठी समित्या स्थापन करुन जबाबदारी निश्चित करण्यात आली आहेत. यासंदर्भात राज्यस्तरावर पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग व ग्राम विकास विभाग या तिन्ही विभागांचा समावेश असलेली राज्यस्तरीय समिती कार्यरत आहे. पेयजलाची गुणवत्ता संनियंत्रणाची जबाबदारी ही पाणीपुरवठा करणाऱ्या संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थांकडे निश्चित करण्यात आली आहे. ग्रामीण स्तरावरील पेयजलाची गुणवत्ता नियंत्रणासाठी ग्रामस्थांच्या सहभागाने ग्रामपातळीवर ग्रामीण आरोग्य पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समित्याची स्थापना केली आहे. सरपंच व ग्रामसेवक यांनी ग्राम प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मदतीने पिण्याच्या पाण्याच्या सर्व सार्वजनिक स्त्रोतांची रासायनिक व अणुजैविक गुणवत्ता तपासणी करुन दुषित पाण्याच्या नमुन्यांबाबत अहवाल प्राप्त झाल्यास, प्रतिबंधात्मक उपाययोजना करुन कार्यवाहीबाबत अहवाल तालुका समिती व तेथून राज्य समितीला सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ वर्षासाठी कव्हरेज व पाणी गुणवत्ता या बाबीसाठी भूजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा, सांगली, बुलढाणा, भंडारा, गोंदिया, वर्धा, नागपूर, रायगड, सिंधुदूर्ग, कोल्हापूर, अहमदनगर, औरंगाबाद, जालना, लातूर व यवतमाळ या जिल्हयांसाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय, दि.१२ फेब्रुवारी, २०१८ अन्वये रु.३६.५९ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. जलस्वराज्य-२ कार्यक्रमांतर्गत नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद, चंद्रपूर, जळगांव, नांदेड, अमरावती, पुणे, बुलढाणा, सातारा या जिल्हयांतील ८७ गावांना दुषित पाणी शुद्धीकरणासाठी आर.ओ.सयंत्र, डिफ्लोरिडेशन युनिट व विरळीकरण यांसारख्या उपाययोजना करण्यासाठी रु.१२.९२ कोटी इतकी रक्कम पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचा शासन निर्णय, दि.०४ ऑगस्ट, २०१७ अन्वये उपलब्ध करण्यात आली आहे. चंद्रपूर व जालना या जिल्हयातील क्षारयुक्त पाणी गुणवत्ता बाधीत गावांना जलशुद्धीकरण संयंत्रे बसविण्यासाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय, दि.२८ मार्च, २०१८ अन्वये रु.२५ कोटी इतके अनुदान उपलब्ध करण्यात आले आहे. तसेच, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत (जल जीवन मिशन) सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी पाणी गुणवत्ता व संनियंत्रण (WQMS) अंतर्गत राज्याचा हिस्सा म्हणून रु. १६ कोटी ११ लक्ष इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

ज्या शाळांत पिण्याचे पाणी दुषित असल्याचे आढळून आले आहे तेथे आवश्यकतेनुसार विविध यंत्रणांच्या माध्यमातून शुद्ध पिण्याचे पाणी पुरविण्याची पर्यायी व्यवस्था करण्याची तजविज ठेवली आहे.

---ooo---

H 1790-20.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२० चे दुसरे (अर्थसंकल्पिय) अधिवेशन लक्षवेधी सूचना

**मा. श्री. अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री.पृथ्वीराज चव्हाण, कुणाल पाटील, सुरेश वरपुडकर, विक्रमसिंह सावंत, चंद्रकांत जाधव, ऋतुराज पाटील, संजय जगताप, विकास ठाकरे, अमित झनक, सुभाष धोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. मोहनराव हंबर्डे, बळवंत वानखडे, राजु पारवे, राजु आवळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"मुंबईत दरवर्षी सरासरी ८ ते १० हजार झोपड्यांची निर्मिती होणे, पुनर्वसन योजना खोळंबल्यामुळे झोपडपट्टीमुक्त मुंबई कुठेही न दिसणे, निर्माण झालेली प्रचंड मंदी आणि पात्र अपात्र झोपडीधारक निश्चित करण्याबाबत होणाऱ्या भ्रष्टाचारामुळे पुर्नविकास योजनेला खीळ बसणे, झोपडपट्टीवासीय एकत्रित येऊन सहकारी संस्था स्थापन करीत विकासकाची निवड करणे झोपडपट्टीधारकांच्या कन्सेंट आणि प्रकल्प छोट्या विकासकांकडून मोठ्या विकासकांना विकले जाणे, आर्थिक असमर्थतेमुळे विकासक स्वत:हून सदर योजना रद्द करणे, साडे बारा लाख झोपडपट्टी मुंबई शहरात असताना २३ वर्षात पुनर्वसन योजनेअंतर्गत विकसित करण्यात येणाऱ्या झोपडपट्टयांच्या जागी निर्माण झालेल्या घरांपैकी फक्त २.०६ लाख परिवारांना नवीन घरे मिळणे, परिणामी पुर्नविकासात होत असलेल्या दिरंगाईमुळे नागरिकांत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने यावर करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

मा. मंत्री गृहनिर्माण यांचे निवेदन

प्रथमत: येथे असे नमूद करण्यात येते की, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून ५ लाख घरांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक परवानग्या (आशयपत्र) देण्यात आलेल्या असून त्यापैकी २,०६,००० पुनर्वसन सदनिकांना भोगवटा प्रमाणपत्र मंजूर केलेले आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील महत्वाचा घटक म्हणजे परिशिष्ट-२ अन्वये पात्र झोपडीधारकांची यादी प्रमाणित करणे हा आहे. परिशिष्ट-२ प्रमाणित करताना विलंब होत असतो, तसेच उपजिल्हाधिकारी (अति/निष्का), बृहन्मुंबई महानगरपालिका आणि म्हाडा या तिघांतर्फे परिशिष्ट-२ प्रमाणित करण्याची प्रक्रिया व्हायची, यात बराच विलंब होत होता. योजनांना गती देण्यासाठी सक्षम प्राधिकारी यांची एकच केंद्रीकृत यंत्रणा उभी करुन मुंबईतील सर्व प्रकारचे परिशिष्ट-२ एकाच यंत्रणेद्वारे ठराविक मुदतीत प्रमाणित करणे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. यामुळे परिशिष्ट-२ शीघ्रगतीने प्रमाणित होऊन योजनांना गती मिळेल.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमध्ये आशयपत्र घेतल्यानंतर एका विकासकाकडून दुसऱ्या

*******

विकासकास हस्तांतरित करण्याचे प्रकार दिसून आले, त्यामुळे दि.२३.०५.२०१५ च्या कार्यालयीन आदेशान्वये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये नियुक्त विकासक बदलण्याकरीता झोपडपट्टी पुनर्वसन योजना क्षेत्राच्या शीघ्रगणकानुसार येणाऱ्या किंमतीच्या ५% इतकी अधिमूल्य आकारणी करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन योजना एका विकासकाकडून दुसऱ्या विकासकाकडे हस्तांतरीत करण्याचे प्रमाण आजमितीस अत्यल्प आहे.

आर्थिक असमर्थतेमुळे झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचा वेग मंदावणे, ही बाब सत्य असली तरी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत :-

- झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमध्ये विकास परवानगी मंजूर करतेवेळी विविध प्रकारची शुल्क आकारणी करण्यात येते. सदर शुल्क एकाच वेळी न भरता बिनव्याजी चार हप्त्यांमध्ये भरण्याकरीता मुभा देण्यात आलेली आहे, जेणेकरुन सदर रक्कमेचा विनियोग पुनर्वसन घटक बांधण्याकरिता विकासक करु शकतो.
- झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविताना येणाऱ्या अडचणी दूर करण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी व विकासक/वास्तुविशारद यांची प्रत्येक महिन्याला संयुक्त बैठक घेण्यात येते.
- ज्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमध्ये अंमलबजावणीकरीता विलंब झालेला आहे व विकासकाने झोपडीधारकांचे भाडे थकविले आहे, अशा योजनांमध्ये विकासकांविरुध्द झोपडपट्टी पुनर्वसन अधिनियम १९७१ चे नियम १३(२) नुसार विकासक काढण्याची कारवाई करण्यात येते. अशा प्रकारे मागील दोन वर्षात एकूण ६२ योजनांमध्ये विकासकांविरुध्द कारवाई करण्यात आलेली असून सहकारी गृहनिर्माण संस्थेस नविन विकासक नियुक्तीची मुभा देण्यात आलेली आहे.
- आर्थिक कारणांमुळे योजनांचा वेग मंदावल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आलेली असून योजनांची अंमलबजावणी करताना येणाऱ्या वित्तीय अडचणींवर उपाययोजना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. तसेच वित्त पुरवठा करणाऱ्या राष्ट्रीयकृत बँकासोबत आवश्यक समन्वय साधून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

उपरोक्त बाबींचा विचार करता, झोपडपट्टयांचा पुनर्विकास हा अधिक गतीने करण्याकरीता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत, असा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

********

रोशा/एच-१८२०-१३.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन लक्षवेधी सूचना

**सर्वश्री. मंगेश कुडाळकर, अजय चौधरी, अबु आजमी, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"मुंबई पश्चिम उपनगरातील कामारोड, रिलायन्स हॉटेलच्या बाजूला (अंधेरी पश्चिम) असलेल्या एसआरए योजनेतील विशाल-ए-१ या इमारतीचे छत कोसळून दिनांक २ फेब्रुवारी, २०२० रोजी ४ रहिवाशी जखमी होणे, उक्त इमारतीचे एसआरए प्रशासनाकडून स्ट्रक्चरल ऑडीट करण्याची रहिवाश्यांकडून सातत्याने होत असलेली मागणी, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, परिणामी इमारतीचे बांधकाम दिवसेंदिवस धोकादायक होत असल्याने मोठया प्रमाणात जीवित व वित्तीय हानी होण्याची शक्यता, एसआरए प्राधिकरणाने तात्काळ सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन इमारतीचा धोकादायक भाग तात्काळ दुरुस्त करुन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

मा. मंत्री गृहनिर्माण यांचे निवेदन

न.भू.क्र.२४९ (भाग), २७१ (भाग) मौजे अंधेरी येथील शासनाच्या मालकीच्या भूखंडावरील ए वन विशाल एस.आर.ए सहकारी गृहनिर्माण संस्थेचे मे.रिलायन्स कंस्ट्रक्शन कंपनी हे विकासक असून, विकास नियंत्रण नियमावली १९९१ च्या विनियम ३३(१०) अंतर्गत सदर संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा प्रस्ताव वास्तुविशारद मे. चिन्मय असोसिएटस यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास सादर केलेला प्रस्ताव प्राधिकरणाने दि.०४.०४.२००६ रोजी स्विकृत केला आहे. सदर योजनेस प्रथम आशयपत्र दि.२२.०६.२०११ व सुधारित आशयपत्र दि.३०.०३.२०१२, दि.२०.०२.२०१३, दि.०८.०१.२०१४ दि.१४.०८.२०१५ व अंतिम आशयपत्र दिनांक २३.०६.२०१७ रोजी देण्यात आले आहे. सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या आशयपत्रान्वये एकूण २१५ झोपडीधारकांपैकी १६० झोपडीधारक पात्र आहेत.

सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत पुनर्वसन घटकाकरीता १ संयुक्त इमारत बांधण्यात आली असून, इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर सदर इमारतीत सर्व पात्र १६० झोपडीधारकांकरीता पूर्ण भोगवटाप्रमाणपत्र दि.०९.११.२०१५ रोजी देण्यात येऊन सदनिका वाटप करण्यात आल्या आहेत. सदर

इमारतीस भोगवटाप्रमाणपत्र देताना वास्तुविशारद, बांधकाम पर्यवक्षक, संरचनात्मक अभियंता यांनी नियमानुसार बांधकाम पूर्णत्वाचा दाखला सादर केला होता.

सदर संयुक्त इमारतीमधील विंग बी सातवा मजल्यावरील सदनिका क्र.७०८ मध्ये दि.०२.०२.२०२० रोजी छताचे प्लास्टर पडल्याने वास्तव्यास असलेल्या रहिवाशांना किरकोळ दुखापत झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे सदर इमारतीची आवश्यक दुरूस्ती तातडीने करण्याच्या व तदुनंतर अशा घटना घडू नयेत, या करीता खबरदारी घेण्याच्या सूचना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने संबंधित विकासकास दि.०३.०२.२०२० रोजी दिल्या आहेत.

विकासकाने सदर सदनिकेम ध्ये आवश्यक दुरूस्तीचे काम करून यापुढे अशा घटना घडणार नाहीत याबाबतची खबरदारी घेण्याची शाश्वती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास दिली आहे. तसेच झोपडपट्टी पुनर्वसन अधिकरणाने संरचनात्मक अभियंत्यामार्फत सदर इमारतीची नव्याने तपासणी करून घेतली असून संरचनात्मक अभियंत्याच्या अहवालानुसार सदर इमारत वापरण्यायोग्य व सुरक्षित आहे, असा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

********

एम १७८३-१३अ•

**लक्षवेधी सूचना**

**ॲड. राहुल कुल, श्री. भिमराव तापकीर, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री. संग्राम थोपटे, महेश लांडगे, चेतन तुपे, सुनिल कांबळे, सुनिल टिंगरे, ॲड. अशोक पवार, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम -१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे:-**

"पुणे व पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीपासून दहा किलोमीटर परिसरात रस्त्यांचे सुयोग्य जाळे (रोड नेटवर्क प्लॅन) शासनाच्या नगर विकास विभागाने सन २०१३ मंजूर केला असणे, या रस्त्यांच्या जाळयानुसार या दोन्ही महापालिका हद्दीलगतच्या परिसरात सुयोग्य रस्त्यांचे जाळे निर्माण करुन या महानगरातील वाहतूक सुरळीत होण्यासाठी एक चांगले पाऊल शासनाने उचलले असणे, तसेच प्लॅन नुसार कित्येक रस्त्यांची कामे शासनाने अद्याप सुरु केलेली नसणे, तदूनंतर स्थापन झालेल्या सन २०१५ मध्ये पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण तसेच महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ यांनी पुणे महानगराच्या ५० किलोमीटर परिसरात पुणे शहराच्या वर्तुळाकार दोन वेगवेगळे रिंगरोड प्रस्तावीत करुनही अद्यापही या दोन्ही रिंगरोड बाबत कोणताही ठोस निर्णय झालेला नसणे, पुणे शहरातील स्वारगेट ते हडपसर या मार्गावर तयार करण्यात आलेली बीआरटी योजना संपूर्णपणे फसलेली असल्याने या रस्त्यावर सातत्याने मोठया प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असणे. या रस्त्याचे नव्याने नियोजन करण्याची आवश्यकता असणे, पुणे व पिंपरी लगतच्या परिसरात मेट्रो प्रकल्पांची कामे संथ गतीने चालू असून नव्याने मांजरी ते हिंजवडी, फुरसुंगी – स्वारगेट – खडकवासला, वनाज – रामवाडी - वाघोली – रांजणगाव गणपती, निगडी – भोसरी – चाकण या प्रस्तावित मेट्रो मार्गाचे बृहत आराखडे तयार करुन सदर मेट्रो मार्गाना तातडीने मान्यता मिळण्याची आवश्यकता असणे, नेहमीच्या होणा-या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांच्या मनात मोठया प्रमाणावर असंतोष निर्माण झालेला असणे याबाबत शासनाने करायची कार्यवाही व उपाययोजना "

---

**मा. मंत्री (नगर विकास विभाग) यांचे निवेदन**

पुणे शहर हे महाराष्ट्रातील औद्योगिक व माहिती तंत्रज्ञान व शैक्षणिक बाबींसाठी देशातील अग्रगण्य शहर म्हणून ओळखले जाते. सद्यपरिस्थितीत या शहरातून पुणे-सोलापूर (एनएच-९) व पुणे-सातारा-कोल्हापूर (एनएच-४८) व पुणे-औरंगाबाद (एसएच-२७) तसेच पुणे-नाशिक (एनएच-५०) हे मुख्य वाहतूकीचे मार्ग आहेत. मुंबई, नाशिक, अहमदनगर, औरंगाबाद, कोल्हापूर, बेंगळूरु, सोलापूर, हैद्राबाद या शहरांतून येणारी वाहतूक शहरातून मार्गक्रमस्थ होत असल्यामुळे पुणे व पिंपरी-चिंचवड शहरांमध्ये मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होत असून यामुळे स्थानिक वाहतुकीवर परिणाम होत आहे. यास्तव इतर शहरांदरम्यानची वाहतूक पुणे व पिंपरी-चिंचवड शहरांबाहेरुन योग्य त्या दिशेला वळवणे आवश्यक आहे. यानुषंगाने पुणे व पिंपरी-चिंचवड शहरांच्या बाहेर १० ते १५ किमी परिघात पीएमआरडीएमार्फत व २० ते २५ किमी परिघात महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत असे दोन रिंगरोड उभारण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे.

पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीलगतच्या १० कि.मी. क्षेत्रासाठी ९० मी. रुंदीच्या रिंगरोड आखणीच्या प्रस्तावास दि. ७.०९.२०१३ रोजीच्या शासन अधिसूचनेद्वारे मंजूरी देण्यात आली होती. तदनंतर ९०

मी रुंदी ऐवजी ११० मी. रुंदीचा रिंग रोड शासन अधिसूचना दि. १७.०३.२०१७ नुसार मंजूर करण्यात आला आहे. सदर रिंगरोडची लांबी १२८.०८ किमी असून याकरिता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत रु. ७,४१२ कोटी खर्चास प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सदर रिंग रोड पुणे-अहमदनगर रस्ता (वाघोली, ता. हवेली) ते पुणे - सातारा रस्ता (आंबेगाव, ता. हवेली), पुणे - सातारा रस्ता (आंबेगाव, ता. हवेली) ते मुंबई – पुणे द्रुतगती मार्ग (उर्से, ता. मावळ) व मुंबई -पुणे द्रुतगती मार्ग (उर्से, ता. मावळ) ते पुणे - अहमदनगर रस्ता (वाघोली, ता. हवेली) ह्या तीन भागात करण्याचे नियोजन करण्यात आले असून त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे.

प्रथम टप्प्यातील पुणे - अहमदनगर रस्ता ते पुणे सातारा रस्ता यामधील अंशतः २३.२० किमी लांबीच्या सेवा रस्त्याच्या कामाच्या रु. २९३.४० कोटी किंमतीच्या निविदा निश्चितीची कार्यवाही पूर्ण करुन या कामाची निविदा स्वीकृतीची (एलओए) कार्यवाही करण्यात आली आहे. याकरिता आवश्यक जमीन उपलब्ध झाल्यानंतर सदर काम हाती घेण्याचे नियोजन आहे. पुणे-अहमदनगर रस्ता ते पुणे-सातारा रस्ता या भागाच्या मुख्य रस्त्याचा रु. १९८१.३१ कोटी खर्चाचा सविस्तर प्रकल्प अहवाल भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे सादर केला असून प्राधिकरणाच्या स्तरावर छाननी प्रगतीपथावर आहे.

सदर रिंग रोडसाठी आवश्यक असणारी जमीन नगररचना योजना, चटई क्षेत्र निर्देशांक, हस्तांतरणीय विकास हक्क (टिडीआर) व थेट खरेदी याद्वारे प्राप्त करण्याचे नियोजन केले आहे. सदर रिंग रोडसाठी एकूण १४०८.८८ हे. जमिनीची आवश्यकता आहे. यानुषंगाने संबंधित विभागांना जमीन मागणी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदर प्रकल्पासाठी आवश्यक एकूण १२९३.१८ हेक्टर खासगी जमिनीपैकी आतापर्यंत ३३.४४ हेक्टर एवढ्या जामिनीचा प्रत्यक्ष ताब्यात घेण्यात आला आहे. सदर प्रकल्पासाठी आवश्यक निधी व जमीन उपलब्ध झाल्यानंतर रिंगरोडचे काम हाती घेण्याचे नियोजित आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत प्रस्तावित रिंगरोडचे पूर्व भाग आणि पश्चिम भाग असे दोन टप्पे आहेत. प्रस्तावित बाह्यवळण रस्त्याच्या पूर्व भागामध्ये मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील उर्से टोल नाका ते मौजे वरवे सातारा महामार्गापर्यंत ६६ कि.मी. लांबीचा रिंगरोड प्रस्तावित आहे. सदर लांबी पैकी उर्से ते सोलू ही ३८ कि.मी.लांबी पीएमआरडीए व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्यामध्ये सामाईक राहणार असून सदर सामाईक लांबी पीएमआरडीएकडून विकसीत केली जाणार आहे. सदर रस्त्यावरील अपेक्षित वाहतूक विचारात घेऊन सोलू ते सोलापूर रस्ता या भागात ३ + ३ लेन रुंदीचा व सोलापूर रस्ता ते सातारा रस्ता या लांबीत २ + २ लेन रुंदीचा मार्ग प्रस्तावित केला आहे. या लांबीत भिमा व मुळा मुठा नदीवर दोन मोठे पूल, पुणे सोलापूर व पुणे मिरज या रेल्वेलाईनवर दोन रेल्वे उड्डाण पूल प्रस्तावित केले आहेत. तसेच पुरंदर तालुक्यातील लांबीत ७ बोगदे प्रस्तावित असून, सर्वात लांब बोगद्याची लांबी १२०० मीटर असणार आहे.

पश्चिम भागातील रिंगरोडच्या आखणीस विशेष राज्यमार्ग क्र.१ असा दर्जा देण्यात आला आहे. प्रस्तावित रिंगरोडच्या पश्चिम भागामध्ये वरवे बु. पासून मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील उर्से पर्यंत ६६.१० कि.मी. लांबी व ३ + ३ लेन रुंदीचा मार्ग प्रस्तावित आहे. या मार्गावर खडकवासला बॅक वॉटर, मुळा नदी, पवना नदी व बहुली गाव येथे चार मोठे पूल प्रस्तावित आहेत. तसेच या लांबीत ७ बोगदे प्रस्तावित असून, सर्वात लांब बोगद्याची लांबी ५.६० कि.मी. असणार आहे.

H/1798-1a

सदर रिंगरोडसाठी ९० मीटर रुंदी प्रमाणे भूसंपादन करण्यात येणार असून एकूण सुमारे १२११.३६ हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे. प्राथमिक अंदाजानुसार सदर प्रकल्पासाठी भूसंपादनावरील खर्चासह एकूण रु. १२,९३५ कोटी खर्च अंदाजित आहे.

स्वारगेट ते हडपसर दरम्यानच्या भागात उपलब्ध रस्ता रुंदीप्रमाणे प्रत्यक्षात स्वतंत्र बीआरटी मार्ग २.५ कि.मी. लांबीचा असून पायलट बीआरटी प्रकल्पाअंतर्गत येथे सन २००७-०८ पासून स्वतंत्र बस मार्ग कार्यान्वित होता.तद्नंतरच्या कालावधीत सदर रस्त्यावर उड्डाणपुल, सब-वे त्याचप्रमाणे संमिश्र वाहतूक इ.कारणांमुळे सदर बीआरटी मार्ग वाहतुकीस गैरसोयीचा झालेला होता. सदर रस्त्यावर होणारी वाहतूक कोंडी विचारात घेऊन वाहतूक विभागाच्या सूचनेनुसार स्वतंत्र बीआरटी मार्ग बंद करुन या रस्त्यावर संमिश्र वाहतुक सुरु करण्यात आली आहे. पीएमआरडीएमार्फत सिव्हिल कोर्ट, शिवाजीनगर ते हडपसर दरम्यान विस्तारीत मेट्रो मार्ग प्रस्तावित करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावित मेट्रो मार्गिकेचे काम पुर्ण झाल्यानंतर स्वारगेट ते हडपसर दरम्यान स्वतंत्रपणे पुनर्रचित बीआरटी मार्ग सुरु करण्याचे नियोजित आहे. या दरम्यानच्या कालावधीत या मार्गावरील वाहतुक कोंडी दूर करण्यासाठी अस्तित्वातील सेवा रस्ते, फुटपाथ, सायकल ट्रॅक यांची पुनर्रचना करुन एक अतिरिक्त लेन विकसित करण्याचे पुणे महानगरपालिकेमार्फत नियोजित आहे.

पुणे महानगर परिक्षेत्रातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी अभ्यास करुन तयार करण्यात आलेल्या सर्वंकष वाहतुक आराखड्यात विविध मेट्रो मार्गिकांची शिफारस करण्यात आली आहे. या मार्गिकांपैकी निगडी ते कात्रज दरम्यान स्वारगेट - पिंपरी- चिंचवड- निगडी मेट्रो मार्गिका तसेच चांदणी चौक ते वाघोली दरम्यान वनाज ते रामवाडी मेट्रो मार्गिका या प्रकल्पाची अंमलबजावणी महामेट्रोमार्फत करण्यात येत असून आतापर्यंत सुमारे ३६ टक्के स्थापत्य काम पूर्ण करण्यात आले आहे व सदर प्रकल्प माहे मार्च, २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे. माण ते लोणी काळभोर दरम्यान हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गिकेचे काम पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सार्वजनिक खाजगी सहभागातून करण्यात येत असून प्रकल्पाचे काम सन २०२२ अखेर पूर्ण करण्याचे नियोजित आहे. पुणे महानगर प्रदेशातील वाहतूक व्यवस्था सुधारण्याच्या अनुषंगाने मेट्रो प्रकल्पांची टप्पाटप्प्याने अंमलबजावणी करण्यासाठी प्राथमिक प्रकल्प अहवाल / सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची बाब तपासण्यात येत आहे.

*********

H/1798-2

८६

**महाराष्ट्र विधानसभा लक्षवेधी सुचना**
**सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्प) अधिवेशन**

सर्वश्री मोहन मते, राधाकृष्ण विखे-पाटील, प्रदीप जैस्वाल, ॲड. पराग अळवणी, ॲड. आशिष शेलार, कॅप्टन आर.तमिल सेल्वन, सर्वश्री. संजय पोतनीस,चंद्रकांत पाटील,महेंद्र दळवी, संतोष बांगर, किशोर पाटील, अजय चौधरी,संजय गायकवाड,डॉ. संजय रायमुलकर, श्री. कालीदास कोळंबकर, ॲड.राहूल कुल, श्री.अबू आझमी, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.

"राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,शासकीय दंत महाविद्यालयात सर्वांत स्वस्त दरात दंत उपचार केले जात असून त्यामुळे हजारो रुग्णांना याचा लाभ मिळणे, राज्यात स्थानिक तसेच संचालक पातळीवर होणारी यंत्र खरेदी सन २०१६ -१७ पासून हाफकिन महामंडळाच्या माध्यमातून होत असणे,सन २०१७-१८ पासून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना यंत्र सामुग्री खरेदीसाठी निधी वर्ग करण्यात आलेला असणे, परंतु अद्यापही शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना यंत्र सामुग्रीसाठी करावी लागणारी प्रतिक्षा, तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना वेळेवर औषधांचा पुरवठा होत नसल्याने रुग्णांना खाजगी दुकानांतून औषधे खरेदी करावी लागणे, सदर परिस्थितीमुळे आर्थिक भार सहन करावा लागत असून नाहक त्रास होत असल्याचे निर्दशनास येणे, सन २०१७-१८ व सन २०१८-१९ घाटी रुग्णालयाला सुमारे ४ कोटी रुपयांचा निधी हाफकिन कडे वर्ग करण्यात आलेला असतांना त्यापैकी केवळ २१ लाखांची यंत्रसामुग्री प्राप्त होणे, तसेच घाटी रुग्णालयात सन २०१८-१९ ची २३३ पैकी ९३ प्रकारची केवळ ४० टक्के औषधांचा पुरवठा झाला असल्याने औषधांचा तुटवडा भासणे, रुग्णालयात वेंटीलेटर यंत्राची सोय नसल्याने रुग्णांना खाजगी रुग्णालयात जाऊन खर्चिक उपचार घ्यावे लागणे, परिणामी रुग्णांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना अत्याधुनिक यंत्रसामुग्री, औषधे तसेच सर्व सोयीसुविधा पुरविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही प्रतिक्रिया व भुमिका"

**मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे निवेदन**

---

राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय/दंत महाविद्यालये व रुग्णालयांमध्ये वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागामार्फत निश्चित केलेल्या दरानुसार उपचार केले जातात. शासनाने सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक २६.०७.२०१७ च्या शासन निर्णयान्वये सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या अधिपत्याखालील आरोग्य संस्थांसाठी लागणाऱ्या औषधे, तदअनुषंगिक उपभोग्य वस्तू व वैद्यकीय उपकरणे इत्यादी बाबींच्या दरांमध्ये व मानकांमधील तफावत दुर करुन एकसुत्रता आणण्याकरिता सदर

शेटा H/1800-1(600-10-2020)

[कृ.मा.प.]

खरेदी व्यवस्थापकीय संचालक,हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ यांच्या नियंत्रणाखालील हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ अंतर्गत खरेदी कक्षामार्फत करण्याचा निर्णय घेतला आहे.

संचालनालय,वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या अंतर्गत संस्थांकडून औषधे व इतर बाबींकरिता हाफकिन जीव औषध महामंडळ अंतर्गत खरेदी कक्षास माहे फेब्रुवारी, २०२० पर्यंत रुपये १११ कोटी प्राप्त झाले असून हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ अंतर्गत खरेदी कक्षाकडून रुपये १८९.४४ कोटी एवढ्या रक्कमेची औषधे व इतर अनुषंगिक बाबींचे पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच साहित्य व उपकरणांसाठी रुपये १२५.२४ कोटींचे पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांना वेळेवर औषधांचा पुरवठा होत नसल्याने रुग्णांना खाजगी दुकानांतून औषधे खरेदी करावी लागण्याबाबतच्या कोणत्याही तक्रारी संस्थेस प्राप्त झालेल्या नाहीत.

सन २०१७-१८ मध्ये हाफकिन महामंडळाकडे घाटी रुग्णालयासाठी वर्ग करण्यात आलेल्या सर्व  रुपये ८.५४ कोटी एवढया निधीची यंत्रसामुग्री उपलब्ध करुन देण्यात आलेली असून सन २०१८-१९ मध्ये वर्ग केलेल्या निधीपैकी रुपये १५ कोटी इतक्या रक्कमेची यंत्रसामुग्री घाटी रुग्णालयास उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच घाटी रुग्णालयासाठी सन २०१८-१९ मध्ये २२१ बाबींकरिता रुपये ५.३५ कोटी रुपयांच्या औषधे व इतर बाबींचा पुरवठा करण्यात आला आहे. तसेच औषधांचा तुटवडा निर्माण झाल्यास रुग्णालयातील रुग्णसेवा विस्कळीत होऊ नये याकरिता उपलब्ध दरकरारावर त्याचप्रमाणे स्थानिक पुरवठादारांकडून दरपत्रके मागवून औषधी व सर्जिकल बाबी उपलब्ध करुन देण्यात येतात.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) औरंगाबाद येथे एकूण ४५ व्हेंटीलेटर रुग्णोपचारासाठी चालू स्थितीत उपलब्ध आहेत. संस्थेतील ११ व्हेंटीलटर्सचे आयुर्मान संपुष्टात आल्याने त्यांच्या निर्लेखनाची कार्यवाही सुरू आहे. तर नादुरूस्त व्हेंटीलेटर्स संबंधित पुरवठादाराकडून दुरूस्त करुन घेण्यात येत आहेत. संस्थेस नवीन व्हेंटीलेटर्स खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर व्हेंटीलेटर्सची खरेदी विषयक कार्यवाही हाफकीन महामंडळामार्फत करण्यात येत आहे. राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांना राज्य योजना, जिल्हा वार्षिक योजना इत्यादी माध्यमातून प्रती वर्ष प्राप्त होणा-या निधीतून यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत असते.

*****************************

H/1800-19

uploaded on
9-11-2020